# विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा २७ पासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षा आज, बुधवारपासून घेण्यात येणार होत्या. मात्र, पुढील तीन दिवस होणाऱ्या बी. एड. अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा आणि जास्त प्रमाणात असलेल्या पावसाच्या शक्यतेमुळे या परीक्षा स्थगित केल्या आहेत. आता त्यांचा प्रारंभ दि. २७ ऑक्टोबरपासून होणार आहे.

बी. एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणाऱ्या ऑनलाईन राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) असलेल्या दिवशी विद्यापीठाच्या अंतिम सत्र, वर्षाच्या कोणत्याही परीक्षा ठेवण्यात येऊ नयेत, असे शिक्षण संचालनालयाकडून (उच्च शिक्षण) विद्यापीठाला पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. ही सीईटी देणाऱ्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे. या विद्यार्थ्यांनी सीईटीच्या कालावधीत अंतिम सत्र, वर्षाची परीक्षा विद्यापीठाने घेऊ नये, अशी मागणी केली आहे. राज्यात पुढील तीन ते चार दिवस जास्त प्रमाणात पावसाची शक्यता आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्यासह इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अडथळा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षांचा प्रारंभ दि. २७ ऑक्टोबरपासून करण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षेचे नवीन वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी दिली.



## एका महिन्यात चौथ्यांदा बदलली तारीख

विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकारने निर्देश दिल्यानंतर विद्यापीठाने दि. १ ऑक्टोबरपासून अंतिम सत्र, वर्षाची परीक्षा घेण्याचे नियोजन केले. पण, तांत्रिक अडचणीमुळे दि. १० ऑक्टोबरपासून घेण्याचा निर्णय घेतला. मात्र, लेखणी बंद आंदोलन आणि परीक्षा घेण्यासाठीच्या एजन्सी निवडीची प्रक्रिया लांबल्याने विद्यापीठाने दि. १७ ऑक्टोबरपासून परीक्षा घेण्याचे नियोजन केले. पण, राज्यातील अतिवृष्टीमुळे चक्रीवादळाची शक्यता असल्याने या नैसर्गिक आपत्तीचा विचार करून विद्यापीठाने या तारखेत बदल केला आणि दि. २१ ऑक्टोबरचे नियोजन जाहीर केले. आता पुन्हा दि. २७ पासून परीक्षा घेण्याचे जाहीर केले आहे.

# विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षा आता २७ पासून

**कोल्हापूर, ता. २० :** शिवाजी विद्यापीठाने अंतिम वर्षाची परीक्षा पुन्हा स्थगित केली आहे. या परीक्षा बुधवार (ता. २१) पासून सुरू होणार होत्या; मात्र याच कालावधीत बी.एड. च्या परीक्षा असल्याने विद्यापीठीय परीक्षा नकोत, अशी सूचना उच्च शिक्षण संचालनालयाने केली. त्यामुळे सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा २७ ऑक्टोबरपासून सुरू होतील. विद्यापीठाने याबाबत परिपत्रक जाहीर केले आहे.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा म्हणजे अडथळ्यांची शर्यत झाली आहे. सुरुवातीला परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात होतील, असा अंदाज होता. मात्र, त्या (ता. १७) पासून होतील, असे जाहीर करण्यात आले. या काळात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला होता. त्यामुळे परीक्षा बुधवार (ता. २१) पासून होणार, असे जाहीर करण्यात आले. मात्र, आता पुन्हा परीक्षा पुढे गेल्या आहेत. उच्च शिक्षण संचालनालयाने विद्यापीठाला याबाबत पत्र पाठवले. राज्यात सर्वत्र बी.एड. ची परीक्षा असल्याने या काळात परीक्षा घेऊ नयेत, असे पत्रात म्हटले आहे. अतिवृष्टीच्या शक्यतेने तांत्रिक समस्याही येण्याची शक्यता आहे.

जेव्हा च